दिलीप वळसे पाटील कला व वाणिज्य महाविद्यालय
ग्रंथालय
रजि.नं. 8054
निमगांव सावा

५

# कायदेमंडळ

Legislature

*अ) केंद्रीय कायदेमंडळ - रचना, अधिकार व कार्ये : १) लोकसभा २) राज्यसभा*
*ब) घटकराज्य विधिमंडळ - रचना, अधिकार व कार्ये : १) विधानसभा २) विधानपरिषद*

भारतीय राज्यघटनेनुसार भारताने द्विगृही कायदेमंडळाचा स्विकार केला असून भारताच्या कायदेमंडळास 'संसद' असे संबोधले जाते. लोकसभा हे संसदेचे प्रथम तथा कनिष्ठ सभागृह असून ते जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणून ओळखले जाते. तर राज्यसभा हे संसदेचे द्वितीय तथा वरिष्ठ सभागृह असून ते घटक राज्यांचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह मानले जाते. केंद्रीय पातळीप्रमाणेच घटक राज्यातही द्विगृही विधिमंडळे असून घटकराज्याच्या प्रथम तथा कनिष्ठ सभागृहाला विधानसभा व द्वितीय तथा वरिष्ठ सभागृहाला विधानपरिषद म्हणून संबोधले जाते. या प्रकरणात आपण केंद्रीय कायदेमंडळ व घटकराज्यातील विधिमंडळ त्यांची रचना, अधिकार व कार्ये यांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

## अ) केंद्रीय कायदेमंडळ : रचना, अधिकार व कार्ये

भारताच्या केंद्रीय कायदेमंडळास 'संसद' असे म्हणतात. संसदेचे दोन सभागृह असून लोकसभा हे प्रथम तथा कनिष्ठ सभागृह मानले जाते. तर राज्यसभा हे द्वितीय तथा वरिष्ठ सभागृह म्हणून ओळखले जाते. ही दोनही सभागृह मिळून भारतीय संसद द्विगृही बनली आहे.

### १) लोकसभा

लोकसभा हे भारतीय संसदेचे प्रथम तथा कनिष्ठ सभागृह असून भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ मध्ये त्याविषयीची तरतूद केलेली आहे. या सभागृहात

जनतेने प्रत्यक्ष निवडून दिलेली प्रतिनिधी असल्याने हे लोक प्रतिनिधी गृह म्हणूनही ओळखले जाते.

| लोकसभा |
| --- |
| » लोकसभेची रचना |
| » सदस्यांची निवड |
| » सदस्यत्वासाठीची पात्रता |
| » कार्यकाळ |
| » गणसंख्या |
| » लोकसभेचा सभापती |

**लोकसभेची रचना**

भारतीय राज्यघटनेच्या ८१ व्या कलमात लोकसभेची सदस्यसंख्या निश्चित करण्यात आलेली आहे. लोकसभेत एकूण ५४५ सदस्य असतात. त्यापैकी ५३० सदस्य हे घटक राज्यांतील मतदार संघातून निवडणुकीद्वारे जनतेकडून निवडले जातात. तर उर्वरित १३ सदस्य हे केंद्रशासित प्रदेशांतून निवडले जातात. अँग्लो-इंडियन जमातींना लोकसभेत योग्य प्रतिनिधित्व मिळाले नसेल तर त्यांचे दोन सभासद नियुक्त करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो.

**सदस्यांची निवड**

लोकसभेतील सदस्यांची निवड गुप्त व प्रौढ मतदान पध्दतीने जनतेकडून होते. त्यासाठी संपूर्ण देशामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात मतदार संघ तयार केले जातात. प्रत्येक मतदार संघातून कितीही उमेदवार निवडणूक लढवीत असले तरी एकच उमेदवार बहुमताने प्रतिनिधी म्हणून निवडला जातो.

**सदस्यत्वासाठीची पात्रता :** भारतीय राज्यघटनेच्या कलम ८४ मध्ये लोकसभेच्या सदस्यत्वासाठीची पात्रता दिली आहे.

**पात्रतेच्या अटी**

- ती व्यक्ती भारतीय नागरीक असली पाहिजे.
- तिचे वय २५ वर्ष पूर्ण असले पाहिजे.
- संसदेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी तिने पूर्ण केलेल्या असाव्यात.

**अपात्रतेच्या अटी**

- केंद्र किंवा राज्य सरकार यातील आर्थिक लाभाच्या पदावर ती व्यक्ती नसावी.
- ती व्यक्ती मानसिकदृष्ट्या विकलांग तसेच दिवाळखोर नसावी.
- फौजदारी गुन्हांमुळे दोन वर्षांपेक्षा जास्त शिक्षा झालेल्यांना निवडणुक लढविता येत नाही.
- परकीय नागरीकत्व स्वीकारलेल्या व्यक्तीला निवडणूक लढविता येत नाही.
- संसदेच्या कोणत्याही कायद्याने तिला अपात्र ठरविले असल्यास.

**कार्यकाळ**

लोकसभेची मुदत पाच वर्षांची असते. मुदत संपण्यापूर्वीही लोकसभा विसर्जित करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला देण्यात आला आहे. आणिबाणीच्या काळात संसद कायदा करून ही मुदत एका वेळी एका वर्षाने वाढवू शकते परंतु आणिबाणी संपुष्टत आल्यावर सहा महिन्यांच्या आत निवडणुका घेणे बंधनकारक असते.

**गणसंख्या**

लोकसभेचे कामकाज चालविण्यासाठी एकूण सदस्य संख्येच्या दहा टक्के सदस्य उपस्थित राहणे आवश्यक असते. गणसंख्या पूर्ण नसल्यास सभापती कामकाज स्थगित करू शकतो.

**■ लोकसभेचा सभापती**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ९३ ते कलम ९७ मध्ये सभापती विषयीची तरतुद केली आहे. लोकसभेच्या निवडणुकीनंतर पहिल्या अधिवेशनात लोकसभेचे सदस्य त्यांच्यातील एकाची सभापती तर दुसऱ्याची उपसभापती म्हणून निवड करतात. सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी सभापतीचे पद आवश्यक असून सभापतीच्या गैरहजेरीत त्याचे काम उपसभापती पाहतात.

**सभापतीचा कार्यकाळ :** सभापतीचा कार्यकाळ हा पाच वर्षांचा म्हणजेच लोकसभेच्या कार्यकाळाएवढाच असतो. अर्थात सभापती स्वमर्जीने आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतो. लोकसभेच्या सभापतीवर अविश्वासाचा ठराव पास केला तर त्याला पदावरून दूर व्हावे लागते. अर्थात तशा प्रकारची लेखी सूचना चौदा दिवस आधी लोकसभेला द्यावी लागते. लोकसभा बरखास्त झाल्यानंतर देखील नवीन लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनापर्यंत तो आपल्या पदावर राहू शकतो.

**सभापतीने अधिकार व कार्ये**

» सभागृहातील कामकाजाला मार्गदर्शन करण्याचे तथा कामकाजाच्या नियमांचा अर्थ स्पष्ट करणे.

» सभागृहात एखादा प्रश्न स्वीकारणे किंवा न स्विकारणे, स्थगन प्रस्ताव मान्य करणे किंवा अमान्य करणे, एखाद्या सदस्याने महत्वाचा प्रश्न उपस्थित केला तर त्यावर निर्णय देण्याचा अधिकार सभापतीला असतो.

» सभागृहात शांतता व शिस्त ठेवण्याचे कार्य सभापतीला करावे लागते. सभागृहातील सदस्यांवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार त्याला देण्यात आला आहे.

» सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालविणे. एखाद्या सदस्यांचे

असंसदीय शब्द कामकाजातून काढून टाकणे. सभासदाच्या गैरवर्तनाबद्दल त्याला समज देणे अथवा सभागृहातून बाहेर जाण्यास सांगणे इत्यादी अधिकार सभापतीस असतात.

» गणपूर्ती अभावी अथवा सभागृहांतील गोंधळावेळी सभागृहाचे कामकाज तहकूब करणे.
» लोकसभेतील सदस्यांचे विशेषअधिकारांचे रक्षण करणे.
» सभागृहाचे पावित्र्य व प्रतिष्ठा जपणे.
» लोकसभेच्या सभापतीला एखादे विधेयक आर्थिक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार असतो.
» संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीच्या वेळी अध्यक्षस्थान स्विकारणे.
» जेव्हा एखाद्या विधेयकावर दोन्ही बाजूंनी समसमान मते पडल्यास सभापती आपले निर्णायक मत देतो.

**२) राज्यसभा**

| राज्यसभा |
|---|
| » राज्यसभेची रचना |
| » सदस्यांची निवड |
| » सदस्यत्वासाठीची पात्रता |
| » कार्यकाळ |
| » गणसंख्या |
| » राज्यसभेचे अध्यक्ष |

राज्यसभा हे संसदेचे द्वितीय तथा वरिष्ठ सभागृह आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ७९ ते १२ मध्ये राज्यसभेविषयीची तरतूद केलेली असून राज्यसभा हे घटकराज्यांचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणून ओळखले जाते.

**राज्यसभेची रचना**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८० नुसार राज्यसभेत एकूण २५० सदस्य संख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यापैकी २३८ सदस्य हे घटक राज्यांच्या विधानसभांकडून निवडले जातात तर उर्वरित १२ सदस्य हे राष्ट्रपतींकडून साहित्य, कला, वाड्मय, समाजसेवा, विज्ञान इत्यादी क्षेत्रातील नामवंत व्यक्तींतून नियुक्त केले जातात.

**सदस्यांची निवड**

राज्यसभेतील २३८ सदस्यांची निवड घटक राज्यांच्या विधानसभेतील सदस्यांकडून गुप्त व एकल संक्रमणीय मतदान पध्दतीने होते. अर्थात ही संख्या घटक राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असल्याने प्रत्येक घटक राज्याच्या राज्यसभेतील प्रतिनिधींची संख्या वेगवेगळी आहे.

**सदस्यत्वासाठीची पात्रता** : भारतीय राज्यघटनेच्या कलम ८४ मध्ये राज्यसभेच्या सदस्यत्वासाठी पात्रता स्पष्ट केली आहे.

**पात्रतेच्या अटी**

» ती व्यक्ती भारताची नागरीक असली पाहिजे.
» तिचे वय ३० वर्ष पूर्ण असले पाहिजे.
» संसदेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी तिने पूर्ण केलेल्या असाव्यात.

**अपात्रतेच्या अटी**

» केंद्र किंवा राज्य सरकार यातील आर्थिक लाभाच्या पदावर ती व्यक्ती नसावी.
» ती व्यक्ती मानसिकदृष्ट्या विकलांग तसेच दिवाळखोर नसावी.
» फौजदारी गुन्ह्यामुळे दोन वर्षा पेक्षा जास्त शिक्षा झालेल्या व्यक्तीस निवडणुक लढविता येत नाही.
» परकीय नागरीकत्व स्वीकारलेल्या व्यक्तीला निवडणूक लढविता येत नाही.
» संसदेच्या कोणत्याही कायद्याने तिला अपात्र ठरविले असल्यास.

**कार्यकाळ**

राज्यसभा हे कायमस्वरूपी सभागृह असून ते कधीही बरखास्त होत नाही. मात्र राज्यसभेच्या सदस्यांचा कार्यकाळ सहा वर्षांचा असतो. दर दोन वर्षांनी १/३ सदस्य निवृत्त होतात व तेवढेच सदस्य नव्याने निवडले जातात.

**गणसंख्या**

राज्यसभेचे कामकाज चालविण्यासाठी सभागृहातील सदस्यसंख्येच्या १/१० सदस्य सभागृहात हजर असावे लागतात.

## ■ राज्यसभेचे अध्यक्ष

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८९ नुसार भारताचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिध्द अध्यक्ष असतात. अर्थात ते राज्यसभेचे सदस्य नसतात.

अध्यक्षांच्या गैरहजेरीत राज्यसभेचे कामकाज उपाध्यक्ष पाहतात. त्यांची निवड राज्यसभेचे सदस्य आपल्यामधूनच करतात. तसेच बहुमताने ते त्याला बडतर्फही करू शकतात.

**अध्यक्षांचा कार्यकाळ :** अध्यक्षांचा कार्यकाळ पाच वर्ष असतो. कार्यकाळ संपण्यापूर्वीही तो आपला राजीनामा राष्ट्रपतींकडे देऊ शकतो. तसेच त्यांना पदावरून दूरही केले जाऊ शकते. त्यासाठी राज्यसभेच्या सभासदांनी बहुमताने तसा ठराव मंजूर केला व लोकसभेतही तो ठराव मंजूर झाल्यास त्यांना पदावरून दूर व्हावे लागते.

## संसदेतील घटकराज्ये / केंद्रशासित प्रदेशांच्या प्रतिनिधींची संख्या

| | घटक राज्ये | लोकसभा प्रतिनिधी संख्या | राज्यसभा प्रतिनिधी संख्या |
|---|---|---|---|
| १. | आंध्र प्रदेश | २५ | ११ |
| २. | अरूणाचल प्रदेश | ०२ | ०१ |
| ३. | आसाम | १४ | ०७ |
| ४. | बिहार | ४० | १६ |
| ५. | छत्तीसगढ | ११ | ०५ |
| ६. | गोवा | ०२ | ०१ |
| ७. | गुजरात | २६ | ११ |
| ८. | हरियाणा | १० | ०५ |
| ९. | हिमाचल प्रदेश | ०४ | ०३ |
| १०. | जम्मू-कश्मिर | ०६ | ०४ |
| ११. | झारखंड | १४ | ०६ |
| १२. | कर्नाटक | २८ | १२ |
| १३. | केरळ | २० | ०९ |
| १४. | मध्य प्रदेश | २९ | ११ |
| १५. | महाराष्ट्र | ४८ | १९ |
| १६. | मणिपूर | ०२ | ०१ |
| १७. | मेघालय | ०२ | ०१ |
| १८. | मिझोराम | ०१ | ०१ |
| १९. | नागालँड | ०१ | ०१ |
| २०. | ओरिसा | २१ | १० |
| २१. | पंजाब | १३ | ०७ |
| २२. | राजस्थान | २५ | १० |
| २३. | सिक्कीम | ०१ | ०१ |
| २४. | तामिळनाडू | ३९ | १८ |
| २५. | त्रिपूरा | ०२ | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २६. | उत्तराखंड | ०५ | ०३ |
| २७. | उत्तरप्रदेश | ८० | ३१ |
| २८. | पश्चिम बंगाल | ४२ | १६ |
| २९. | तेलंगना | १७ | ०७ |

| | केंद्रशासित प्रदेश | लोकसभा प्रतिनिधी संख्या | राज्यसभा प्रतिनिधी संख्या |
|---|---|---|---|
| १. | दिल्ली | ०७ | ०३ |
| २. | पाँडेचरी (पुडूचेरी) | ०१ | ०१ |
| ३. | अंदमान व निकोबार | ०१ | – |
| ४. | चंदिगढ | ०१ | – |
| ५. | दादर-नगर हवेली | ०१ | – |
| ६. | लक्षद्वीप | ०१ | – |
| ७. | दिव-दमण | ०१ | – |
| | एकूण | ५४३ | २३३ |
| | | ०२ (अँग्लो इंडियन) | १२ (राष्ट्रपतींकडून नियुक्त) |
| | एकूण | ५४५ | २४५ |

**अध्यक्षांचे अधिकार व कार्ये**

» सभागृहात शिस्त व शांतता ठेवण्याचे कार्य अध्यक्षाला करावे लागते. तसेच सभागृहातील सर्व सदस्यांवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार त्याला देण्यात आलेला असतो.

» सभागृहात एखादा प्रश्न स्वीकारणे अथवा अस्विकार करणे, स्थगन प्रस्ताव मान्य अथवा अमान्य करण्याचा अधिकार त्याला असतो.

» सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालविणे तसेच एखाद्या सदस्याचे असंसदीय शब्द कामकाजातून काढून टाकणे, गैरवर्तनाबद्दल सदस्याला समज देणे इत्यादी अधिकार अध्यक्षाला असतात.

» गणपूर्ती अभावी अथवा सभागृहांतील गोंधळवेळी कामकाज तहकुब करणे.

» कामकाजाच्या नियमांचा अर्थ स्पष्ट करणे.
» राज्यसभेतील सदस्यांच्या विशेषाधिकारांचे रक्षण करणे.
» सभागृहाचे पावित्र्य व प्रतिष्ठा जपणे.
» जेव्हा एखाद्या विधेयकावर दोन्ही बाजूंनी सम-समान मते पडल्यास अध्यक्ष आपले निर्णायक मत देऊ शकतो.

**संसदेचे अधिकार व कार्ये**

**१) कायदेविषयक अधिकार व कार्ये**

भारतीय राज्यघटनेतील केंद्रसूचीतील समाविष्ट ९९ विषयांवर कायदे करण्याचा अधिकार संसदेला असून सामाईक सूचीतील ५२ विषयांसंदर्भात व शेषाधिकार यांवरही संसद कायदा करते. त्याचप्रमाणे संसदेचे अधिवेशन सुरू असतांना राष्ट्रपतींनी काढलेल्या वटहुकूमांना मान्यता देण्याचा अधिकारही संसदेस असतो. अन्यथा वटहुकूम रद्द होतो.

संसद एदत्त विधिनियमांनाही मान्यता देते. सामान्य विधेयक कोणत्याही सभागृहात प्रथम मांडता येते. मात्र ते विधेयक दोन्ही सभागृहांमध्ये मंजूर व्हावे लागते. एक सभागृह दुसऱ्या सभागृहातील मंजूर विधेयक फेटाळू शकते. दोन्ही सभागृहांतील मतभेदांच्या वेळी संयुक्त बैठक भरवून विधेयकासंदर्भात निर्णय घेतला जातो.

**२) कार्यकारी अधिकार व कार्ये**

» **निर्वाचनात्मक कार्य :** भारताच्या राष्ट्रपतींची निवड करणाऱ्या निर्वाचन मंडळात लोकसभा व राज्यसभा म्हणजेच संसदेच्या सदस्यांचा समावेश होतो. तसेच उपराष्ट्रपतींची निवड संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत केला जातो.

» **महाभियोगाबाबतीतील अधिकार :** राष्ट्रपती तसेच उपराष्ट्रपतींनी घटनाविरोधी कृत्य केल्यास संसद त्यांना बडतर्फ करू शकते. राष्ट्रपतींच्या बडतर्फीसाठी त्यांच्यावर महाभियोग चालविला जातो. यासाठी संसदच्या कोणत्याही एका सभागृहात राष्ट्रपतींवरील आरोपाचा ठराव विशेष बहुमताने मंजूर झाल्यास दुसरे सभागृह त्यातील आरोपांची चौकशी करते व त्यावेळी राष्ट्रपती दोषी आढळल्यास तिथेही हा ठराव विशेष बहुमताने मंजूर करून राष्ट्रपतींना बडतर्फ केले जाते.

उपराष्ट्रपतींच्या बडतर्फीसाठी संसदेच्या संयुक्त बैठकीत साध्या बहुमताने ठराव मंजुर केला जातो.

» **नियंत्रणात्मक अधिकार :** संसदेचे मंत्रिमंडळावर नियंत्रण असते. मंत्रिमंडळातील सदस्य संसदेच्या कामकाजात भाग घेतात. मंत्रिमंडळाच्या

कारभाराबद्दल प्रश्न विचारणे, चर्चा करणे, ठराव व तहकुबीची सूचना मांडणे या माध्यमातून दोन्ही सभागृहे मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवतात. अर्थात संसदेने मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त केल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

**३) चर्चात्मक अधिकार व कार्ये**

राष्ट्रीय प्रश्नांची चर्चा करणारे देशाचे सर्वोच्च व्यासपीठ म्हणून संसदेकडे पाहिले जाते. केंद्र सरकारच्या अधिकारातील खात्यांच्या कारभाराबद्दल संसद चर्चा घडवून आणते. त्यासाठी प्रश्न विचारणे, लक्षवेधी सूचना, स्थगन प्रस्ताव यांसारखे संसदीय आयुधे वापरली जातात. चर्चेसाठी संसद सदस्यांना पूर्ण भाषण स्वातंत्र्याचा अधिकार असतो या चर्चेतून सरकारच्या उणीवा, दोष व भ्रष्टाचार जनतेला समजतात. त्यामुळे सरकार आपल्या कारभारात योग्य तो बदल घडवून आणतात.

**४) आर्थिक अधिकार व कार्ये**

केंद्र सरकारच्या आर्थिक व्यवहारांवर संसदेचे पूर्ण नियंत्रण असते. संसदेच्या परवानगीशिवाय शासनाला कोणताही कर लादता येत नाही किंवा कोणताही खर्च करता येत नाही. आर्थिक अधिकाराबाबत लोकसभेला राज्यसभेपेक्षा अधिक अधिकार आहेत. आर्थिक स्वरूपाचे विधेयक हे लोकसभेतच प्रथम मांडले जाते राज्यसभेला हे विधेयक फेटाळता येत नाही. चौदा दिवसांच्या आत राज्यसभेने या विधेयकावर निर्णय न दिल्यास आर्थिक विधेयक राज्यसभेला मंजूर आहे असे समजून ते राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठविले जाते. सरकारच्या जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकालाही संसदेची मान्यता आवश्यक असते. अर्थात याबाबत लोकसभेला पूर्णपणे अधिकार असतात.

पुरवण्या-मागण्यांना व संचित निधीतील खर्चालाही मंजूरी देण्याचे काम संसदेकडून केले जाते. अंदाजपत्रकात संसद सदस्याने सुचविलेली खर्चातील कपात लोकसभेत मंजूर झाल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो कारण ही बाब मंत्रिमंडळावरील अविश्वास आहे अशी मानली जाते.

शासनाच्या अर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सार्वजनिक हिशोब समिती व अंदाजपत्रकीय समिती स्थापन करण्याचा अधिकार संसदेला आहे.

**५) न्यायाविषयक अधिकार कार्ये**

» सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश, उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांच्या घटनाविरोधी वर्तनाची चौकशी करून महाभियोग चालविण्याचा अधिकार संसदेला आहे.

» सर्वाच्च व उच्च न्यायालयांची रचना, सेवाशर्ती व भौगोलिक अधिकार क्षेत्र ठरविण्याचा अधिकार संसदेला आहे.

**६) घटनादुरूस्तीविषयक अधिकार व कार्ये**

घटनादुरूस्तीच्या अधिकार दोन्ही सभागृहांना समान असल्याने असे विधेयक कोणत्याही सभागृहात प्रथम मांडले जाते त्यासाठी पुढील पध्दतीचा वापर होतो.

» **संसदेच्या साध्या बहुमताने** : दोन्ही सभागृहाच्या साध्या बहुमताने घटनेच्या काही कलमात दुरूस्ती केली जाते.

» **२/३ बहुमताने (विशेष बहुमताने)** : दोन्ही सभागृहाच्या २/३ बहुमताने घटनेत दुरूस्ती करता येते.

» **विशेष बहुमताबरोबरच घटकराज्यांच्या संमतीने** : घटनेच्या काही भागात दुरूस्ती करण्यासाठी दोन्ही सभागृहांच्या २/३ बहुमताबरोबरच निम्म्याहून अधिक घटकराज्यांच्या विधिमंडळाच्या संमतीने घटनादुरूस्ती केली जाते.

**७) आणिबाणी विषयक अधिकार व कार्ये**

भारतीय राज्यघटनेनुसार राष्ट्रपतींना कलम ३५२, ३५६ व ३६० नुसार आणिबाणी जाहीर करता येते.

» युध्द अंतर्गत बंडाळी निर्माण झाल्यास घटना कलम ३५२ नुसार राष्ट्रपतींना राष्ट्रीय आणिबाणी जाहीर करता येते. राष्ट्रीय आणिबाणी जाहीर झाल्यास त्याला एका महिन्याच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते, अन्यथा ती रद्द होते. आणीबाणीचा ठराव संसदेच्या एकूण सभासदांच्या बहुमताने व उपस्थित सभासदांच्या २/३ बहुमताने मंजूर व्हावा लागतो. संसदेच्या मान्यतेने सहा महिने व पुढे गरजेनुसार तीन वर्षापर्यंत आणीबाणी लागू करता येते. अर्थात लोकसभेच्या १/१० सभासदांनी आणीबाणी रद्द करण्याचा ठराव सभागृहात मांडल्यास

**संसदेचे अधिकार व कार्ये**

» कायदेविषयक अधिकार व कार्ये
» कार्यकारी अधिकार व कार्ये – अ) निर्वाचनात्मक कार्य ब) महाभियोगाबाबतीतील अधिकार क) नियंत्रणात्मक अधिकार
» चर्चात्मक अधिकार व कार्ये
» आर्थिक अधिकार व कार्ये
» न्यायाविषयक अधिकार कार्ये
» घटनादुरूस्तीविषयक अधिकार व कार्य– अ) संसदेच्या साध्या बहुमताने ब) २/३ बहुमताने (विशेष बहुमताने) क) विशेष बहुमताबरोबरच घटकराज्यांच्या संमतीने
» आणिबाणी विषयक अधिकार व कार्ये

व साध्या बहुमताने तो मंजूर झाल्यास आणीबाणी रद्द होते.

- घटक राज्यातील सरकार अस्थिर झाल्यास राष्ट्रपती कलम ३५६ नुसार आणीबाणी घोषीत करतात. अशा आणीबाणीला दोन महिन्यांच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते. त्यासाठी संसदेच्या विशेष बहुमताने ठराव मंजूर व्हावा लागतो. संसदेच्या मान्यतेने सहा महिने व पुढे गरज पडल्यास तीन वर्षांपर्यंत मुदत वाढविता येते.
- आर्थिक संकट उद्‌भवल्यास राष्ट्रपती कलम ३६० नुसार आर्थिक आणिबाणी जाहीर करतात. अशा आणिबाणीला दोन महिन्यांच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते. अन्यथा ती रद्द होते. या आणीबाणीच्या मान्यतेसाठी संसदेच्या साध्या बहुमताने ठराव मंजूर व्हावा लागतो. संसदेच्या मान्यतेने प्रथम सहा महिने व पुढे गरजेनुसार वाढविता येते.

**ब) घटकराज्य विधिमंडळ : रचना, अधिकार व कार्ये**

केंद्रीय पातळीप्रमाणेच घटक राज्य पातळीवर देखील द्विगृही विधिमंडळाची रचना स्विकारण्यात आली आहे. घटक राज्य विधिमंडळात विधानपरिषद हे वरिष्ठ तथा द्वितीय सभागृह आहे. अर्थात सर्वच घटकराज्यांमध्ये विधानपरिषद अस्तित्वात नाही केवळ सातच घटकराज्यांमध्ये विधानपरिषद अस्तित्वात आहे.

**१) विधानसभा**

घटक राज्यांमध्ये विधानसभा हे विधिमंडळाचे कनिष्ठ तथा प्रथम सभागृह असून भारतीय राज्यघटनेच्या कलम १७० मध्ये त्याची तरतूद करण्यात आली आहे.

**विधानसभेची रचना**

भारतीय राज्यघटनेच्या कलम १७० मध्ये विधानसभेची रचना स्पष्ट केलेली आहे. विधानसभेची सदस्य संख्या ही राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणावर अवलंबून असून कमीत-कमी ६० आणि जास्तीत-जास्त ५०० सदस्य संख्या त्यासाठी निश्चित करण्यात येते.

उदा. महाराष्ट्रांच्या विधानसभेची सदस्य संख्या २८८ आहे.

**विधानसभा**

- विधानसभेची रचना
- सदस्यांची निवड
- सदस्यत्वासाठी पात्रता
- कार्यकाळ
- गणसंख्या
- विधानसभेचे सभापती

विधानसभेत अनुसूचीत जाती-जमातीसाठी काही जागा राखीस असतात. याशिवाय अँग्लो इंडियन जमातीला निवडणुकीद्वारे पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही

तर त्या जमातीचा एक प्रतिनिधी नेमण्याचा अधिकार राज्यपालाला असतो.

**सदस्यांची निवड :** विधानसभेचे सदस्य प्रौढ व गुप्त मतदान पध्दतीने निवडले जातात. विधानसभेच्या सदस्यांच्या निवडीसाठी प्रादेशिक एक प्रतिनिधी मतदार संघाची निर्मिती करून प्रत्येक मतदार संघातून एकच प्रतिनिधी बहुमताने निवडला जातो.

**सदस्यत्वासाठी पात्रता :** सदस्यत्वासाठीची पात्रता-अपात्रता पुढीलप्रमाणे -

**पात्रतेच्या अटी**

» ती व्यक्ती भारताची नागरीक असली पाहिजे.

» तिचे वय २५ वर्ष पूर्ण असले पाहिजे.

» संसदेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी तिने पूर्ण केलेल्या असाव्यात.

**अपात्रतेच्या अटी**

» केंद्र किंवा राज्य सरकार यातील आर्थिक लाभाच्या पदावर ती व्यक्ती नसावी.

» ती व्यक्ती मानसिक दृष्ट्या विकलांग तसेच दिवाळखोर नसावी.

» फौजदारी गुन्हामुळे दोन वर्षांपेक्षा जास्त शिक्षा झालेल्यांना निवडणूक लढविता येत नाही.

» परकीय नागरीकत्व स्वीकारलेल्या व्यक्तीला निवडणुक लढविता येत नाही.

**कार्यकाळ**

विधानसभेची मुदत पाच वर्षांची असते. मुदतीपूर्वी विधानसभा विसर्जित करण्याचा अधिकार राज्यपालांना असतो. आणिबाणीच्या काळात ही मुदत एका वेळी सहा महिने वाढविता येते मात्र आणिबाणी संपताच सहा महिन्यांच्या आत निवडणुका घेणे बंधनकारक असते.

**गणसंख्या**

विधानसभेचे कामकाज चालविण्यासाठी एकूण सभासदांपैकी १/१० सभासद हजर असणे आवश्यक असते.

## ■ विधानसभेचे सभापती

विधानसभेच्या निवडणुकी नंतर पहिल्या अधिवेशनात विधानसभेचे सदस्य त्यांच्या मधुन एकाची सभापती व दुसऱ्याची उपसभापती म्हणून निवड करतात. सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी सभापतीचे पद असून त्याच्या गैरहजेरीत त्याचे काम उपसभापती पाहातात.

**कार्यकाळ :** सभापतीच्या कार्यकाळ पाच वर्षांचा असतो म्हणजे विधानसभेच्या कार्यकाळाएवढाच असतो. अर्थात सभापती स्वमर्जीने आपल्या पदाचा राजीनामा देवू शकतो. विधानसभेच्या सभापतीवर अविश्वास ठराव पास झाला तर त्याला पदावर दूर व्हावे लागते. परंतु तशा प्रकारची लेखी सूचना चौदा दिवस आधी विधानसभेला द्यावी लागते. विधानसभा बरखास्त झाल्यानंतर देखील नवीन विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनापर्यंत तो आपल्या पदावर राहतो.

**सभापतीचे अधिकार व कार्ये**

» सभागृहात प्रश्न स्वीकारणे अथवा नाकारणे, स्थगन प्रस्ताव मान्य करणे, अथवा अमान्य करणे याविषयी निर्णय घेण्याचा त्यांना अधिकार असतो.

» सभागृहात शांतता व शिस्त ठेवण्याचे कार्य सभापती करतो. याशिवाय सभागृहातील सर्व सदस्यांवर नियंत्रण ठेवण्याचा त्याला अधिकार असतो.

» सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालविणे. एखाद्या सदस्यांचे असंसदीय शब्द कामकाजातून काढून टाकणे तसेच गैरवर्तन करणाऱ्या सदस्याला समज देणे अथवा सभागृहातून बाहेर जाण्यास सांगणे.

» विधानसभेच्या कामकाजाला मार्गदर्शन करण्याचे तथा कामकाजाच्या नियमांचा अर्थ स्पष्ट करणे.

» गणपूर्ती अभावी अथवा सभागृहातील गोंधळावेळी सभागृहाचे कामकाज तहकूब करणे.

» विधानसभेतील सदस्यांच्या विशेषाधिकारांचे रक्षण करणे.

» विधानसभेच्या कोणत्याही सदस्याला सभापतीच्या परवानगीशिवाय सभागृहात भाषण करता येत नाही.

» विधानसभेच्या सभापतीला एखादे विधेयक आर्थिक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार असतो.

» सभागृहाचे पावित्र्य व प्रतिष्ठा जपणे.

» जेव्हा एखाद्या विधेयकावर दोन्ही बाजूंनी समान मते पडल्यास सभापती आपले निर्णायक मत देतो.

## २) विधानपरिषद

राज्य विधिमंडळाचे वरिष्ठ तथा दुसरे सभागृह म्हणजे विधानपरिषद होय. भारतीय राज्यघटनेच्या कलम १६८ मध्ये विधानपरिषदेची तरतुद असून केवळ सातच घटक राज्यात सद्य:स्थितीत विधानपरिषद हे सभागृह अस्तित्वात आहे.

### विधानपरिषदेची रचना

| विधानपरिषद |
| --- |
| » विधानपरिषदेची रचना |
| » सदस्यांची निवड |
| » सदस्यत्वासाठीची पात्रता |
| » कार्यकाळ |
| » विधानपरिषदेचे अध्यक्ष |

भारतीय राज्यघटनेच्या कलम १७१ नुसार विधानपरिषदेची सदस्य संख्या ही कमीत कमी ४० तर त्या घटक राज्याच्या विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या १/३ पेक्षा अधिक असू नये.

उदा. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेची सदस्य संख्या ७८ आहे.

### सदस्यांची निवड

विधानपरिषदेचे सदस्य अप्रत्यक्षरीतीने एकल संक्रमण क्रमदेय मतदान पध्दतीने निवडले जातात.

» १/३ सदस्य विधानसभेच्या सदस्यांकडून निवडले जातात.

» १/३ सदस्य राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेकडून निवडले जातात.

» १/१२ सदस्य शिक्षक मतदारसंघाकडून निवडले जातात.

» १/६ सदस्य पदवीधर मतदारसंघातून निवडले जातात.

» १/६ सदस्य हे वाङ्मय, कला, विज्ञान, समाजसेवा या क्षेत्रातील नामवंत व्यक्तींची नेमणूक राज्यपाल करतात.

**सदस्यत्वासाठीची पात्रता** : सदस्यत्वासाठीची पात्रता-अपात्रता पुढीलप्रमाणे

**पात्रतेच अटी**

» ती व्यक्ती भारताची नागरीक असली पहिजे.

» तिचे वय ३० वर्ष पूर्ण असले पाहिजे.

» संसदेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी तिने पूर्ण केलेल्या असाव्यात.

**अपात्रतेच्या अटी**

» केंद्र किंवा राज्य सरकारात आर्थिक लाभाच्या पदावर ती व्यक्ती नसावी.

» ती व्यक्ती मानसिकदृष्ट्या विकलांग तसेच दिवाळखोर नसावी.

» फौजदारी गुन्ह्यामुळे दोन वर्षांपेक्षा जास्त शिक्षा झालेल्या व्यक्तीला निवडणूक लढविता येत नाही.

» परकीय नागरीकत्व स्वीकारलेल्या व्यक्तीला निवडणूक लढविता येत नाही.

**कार्यकाळ**

विधानपरिषद हे कायमस्वरूपी सभागृह असून ते कधीही विसर्जित होत नाही. मात्र विधानपरिषदेतील सदस्यांचा कार्यकाळ हा सहा वर्षांचा असतो. दर दोन वर्षांनी १/३ सदस्य निवृत्त होतात व तेवढेच सदस्य नव्याने निवडले जातात.

■ **विधानपरिषदेचे अध्यक्ष**

विधानपरिषदेचे सदस्य आपल्यामधून बहुमताने एकाची अध्यक्ष तर दुसऱ्याची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात. सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी अध्यक्षाचे पद असून अध्यक्षांच्या गैरहजेरीत त्याचे काम उपाध्यक्ष पाहतात.

**कार्यकाळ** : अध्यक्षाचा कार्यकाळ हा सहा वर्षांचा असतो. अर्थात अध्यक्ष स्वमर्जीने आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतो. विधानपरिषदेच्या अध्यक्षावर अविश्वासाचा ठराव पास झाला तर त्याला आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागतो. मात्र तशा प्रकारची लेखी सूचना चौदा दिवस आधी विधानपरिषदेला द्यावी लागते.

**अध्यक्षाचे अधिकार व कार्ये**

» सभागृहात एखादा प्रश्न स्विकारणे किंवा न स्विकारणे, स्थगन प्रस्ताव मान्य अथवा अमान्य करणे याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्षाला असतो.

» सभागृहात शांतता व शिस्त ठेवण्याचे कार्य अध्यक्षाला करावे लागते तसेच सभागृहातील सर्व सदस्यांवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार अध्यक्षाला देण्यात आला आहे.

» सभागृहात शिस्त राखून सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालविणे. एखाद्या सदस्याचे असंसदीय शब्द कामकाजातून काढून टाकणे. गैरवर्तन करणाऱ्या सदस्याला समज देणे अथवा सभागृहातून बाहेर जाण्यास सांगणे.

» विधानपरिषदेच्या कामकाजाला मार्गदर्शन करण्याचे तथा कामकाजाच्या नियमांचा अर्थ स्पष्ट करणे.

» गणपूर्ती अभावी अथवा सभागृहातील गोंधळावेळी सभागृहाचे कामकाज तहकुब करणे.

» विधानपरिषदेतील सदस्यांच्या विशेषाधिकारांचे रक्षण करणे.

» जेव्हा एखादा विधेयकावर दोन्ही बाजूंनी समान मते पडल्यास अध्यक्ष निर्णायक मत देऊ शकतो.

## घटकराज्यांच्या विधिमंडळातील प्रतिनिधींची संख्या

| | घटक राज्ये | विधानसभा प्रतिनिधी संख्या | विधानपरीषद प्रतिनिधी संख्या |
|---|---|---|---|
| १. | आंध्र प्रदेश | १७५ | ५० |
| २. | अरूणाचल प्रदेश | ४० | – |
| ३. | आसाम | १२६ | – |
| ४. | बिहार | २४३ | ७५ |
| ५. | छत्तीसगढ | ९० | – |
| ६. | गोवा | ४० | – |
| ७. | गुजरात | १८२ | – |
| ८. | हरियाणा | ९० | – |
| ९. | हिमाचल प्रदेश | ६८ | – |
| १०. | जम्मू आणि कश्मिर | ८७ | ३६ |
| ११. | झारखंड | ८१ | – |
| १२. | कर्नाटक | २२४ | ७५ |
| १३. | केरळ | १४० | – |
| १४. | मध्य प्रदेश | २३० | – |
| १५. | महाराष्ट्र | २८८ | ७८ |
| १६. | मणिपूर | ६० | – |
| १७. | मेघालय | ६० | – |
| १८. | मिझोराम | ४० | – |
| १९. | नागालँड | ६० | – |
| २०. | ओरिसा | १४७ | – |
| २१. | पंजाब | ११७ | – |
| २२. | राजस्थान | २०० | – |
| २३. | सिक्कीम | ३२ | – |
| २४. | तामिळनाडू | २३४ | – |
| २५. | त्रिपूरा | ६० | – |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ७० | - |
| २६. | उत्तराखंड | ४०३ | १०० |
| २७. | उत्तरप्रदेश | २९४ | - |
| २८. | पश्चिम बंगाल | ११९ | ४३ |
| २९. | तेलंगना | | |

| | केंद्रशासित प्रदेश | विधानसभा प्रतिनिधी संख्या | |
|---|---|---|---|
| १. | दिल्ली | ७० | |
| २. | पाँडेचरी (पुडुचेरी) | ३० | |

**राज्यविधिमंडळाचे अधिकार व कार्ये**

**१) कायदेविषयक अधिकार व कार्ये**

राज्यघटनेतील राज्यसूचीमधील ६१ विषयांवर राज्यविधिमंडळाचा कायदा करण्याचा अधिकार आहे. तसेच समवर्तीसूचितील ५२ विषयांवर केंद्राच्या कायद्याला सुसंगत असा कायदा राज्य विधिमंडळ करू शकते. घटकराज्याशी संबंधित नविन कायद्याची निर्मिती, जुन्या कायद्याची दुरूस्ती करण्याचा अधिकार राज्यविधिमंडळाला आहे. सामान्य कायद्यांचे विधेयक कोणत्याही सभागृहात मांडता येते. विधानसभेत मंजूर केलेले विधेयक विधानपरिषदेकडे पाठविले जाते. विधानपरिषद त्यात दुरूस्ती सुचवू शकते. मात्र त्या दुरूस्त्या विधानसभा नाकारू शकते. विधानसभेने फेरमंजुरीने पाठविलेले विधेयक एका महिन्याच्या आत विधानपरिषदेने मंजूर न केल्यास विधानसभा ते विधेयक परस्पर राज्यपालांकडे पाठवू शकते. राज्यपालांच्या संमतीनंतर त्याचे कायद्यात रूपांतर होते. अर्थात संसदेप्रमाणे राज्यात मतभेदाच्या वेळी संयुक्त बैठकीची तरतुद नाही.

**२) कार्यकारी अधिकार व कार्ये**

- **मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवणे** : राज्यविधिमंडळ मंत्रिमंडळाच्या कारभारावर नियंत्रण ठेवते. यासाठी विधिमंडळात मंत्र्यांना खात्याच्या कारभाराबाबत प्रश्न विचारणे, चर्चा करणे, ठराव मांडणे, तहकुबीची सूचना मांडणे या मार्गांचा वापर केला जातो.
- **राष्ट्रपतींच्या निवडणुकीत भाग घेणे** : विधानसभेच्या सदस्यांचा समावेश राष्ट्रपतींच्या निर्वाचन मंडळात होत असल्याने ते राष्ट्रपतींच्या निवडणुकीत सहभागी होतात.

३) चर्चात्मक अधिकार व कार्ये

राज्यविधिमंडळात जनहिताशी संबंधित विविध योजना व धोरणांवर चर्चा केली जाते. प्रश्न, ठराव, लक्षवेधी सूचना यांद्वारे सरकारच्या कारभाराचे मूल्यमापन केले जाते. त्यामुळे राज्य सरकार अत्यंत पारदर्शकतेने राज्यकारभार करण्यास भाग पाडते.

४) आर्थिक अधिकार व कार्ये

शासनाच्या आर्थिक व्यवहारांचे नियंत्रण विधिमंडळ करत असते. विधिमंडळाच्या संमतीशिवाय शासनाला पैसा उभारतर येत नाही. तसेच खर्चही करता येत नाही. शासनाच्या सर्व आर्थक व्यवहारांना विधिमंडळाची मान्यता लागते. त्याचप्रमाणे दरवर्षाच्या अंदाजपत्रकालाही विधिमंडळ मंजुरी देते. अर्थात आर्थिक अधिकारांच्या बाबतीत विधानसभेला झुकते माप दिलेले दिसते.

५) घटनादुरूस्ती विषयक अधिकार व कार्ये

राज्यघटनेतील महत्वाच्या दुरूस्तीवेळी संसदेच्या मान्यतेबरोबरच निम्म्याहून अधिक घटकराज्यांच्या विधिमंडळाची संमती आवश्यक असते. त्यासाठी घटकराज्यांना विधिमंडळात साध्या बहुमताने तसा ठराव मंजूर करून द्यावा लागतो.

६) इतर कार्ये

घटकराज्यांच्या नावात किंवा सीमा यात बदल करायचा असेल तर विधानसभा तसा ठराव मंजूर करून संसदेकडे पाठविते. संसदेने अशा ठरावास मंजूरी दिल्यास आवश्यक तो बदल घडवून आणला जातो. याशिवाय विविध आयोगांचे अहवाल, चौकशी समितींचे अहवाल यावर विधानसभेत चर्चा केली जाते व निर्णय घेतले जातात. याबाबत मात्र विधानपरिषदेला अधिकार नाही.

**लोकसभेचे सभापती व त्यांचा कार्यकाळ**

| | लोकसभा | सभापतीचे नाव | कार्यकाळ |
|---|---|---|---|
| १. | पहिली | जी.व्ही. मावळंकर | १९५२ ते १९५६ |
| | | एम.ए. अय्यंगार | १९५६ ते १९५७ |
| २. | दुसरी | एम. ए. अय्यंगार | १९५७ ते १९६२ |
| ३. | तिसरी | हुकूमसिंग | १९६२ ते १९६७ |
| ४. | चौथी | नीलम संजीव रेड्डी | १९६७ ते १९६९ |
| | | जी. एस. धिल्लाँ | १९६९ ते १९७१ |
| ५. | पाचवी | जी. एस धिल्लाँ | १९७१ ते १९७५ |
| | | बळीराम भगत | १९७६ ते १९७७ |

| | लोकसभा | सभापतीचे नाव | कार्यकाळ |
|---|---|---|---|
| ६. | सहावी | नीलम संजीव रेड्डी | मार्च १९७७ ते जुलै १९७७ |
| | | के.एस. हेगडे | १९७७ ते १९८० |
| ७. | सातवी | बलराम जाखर | १९८० ते १९८५ |
| ८. | आठवी | बलराम जाखर | १९८५ ते १९८९ |
| ९. | नववी | रवी रे | १९८९ ते १९९१ |
| १०. | दहावी | शिवराज पाटील | १९९१ ते १९९६ |
| ११. | अकरावी | पूर्णो अमितोक संगमा | १९९६ ते १९९८ |
| १२. | बारावी | जी.एम.सी. बालयोगी | १९९८ ते १९९९ |
| १३. | तेरावी | जी.एम.सी. बालयोगी | १९९९ ते २००२ |
| | | मनोहर जोशी | २००२ ते २००४ |
| १४. | चौदावी | सोमनाथ चटर्जी | २००४ ते २००९ |
| १५. | पंधरावी | श्रीमती मीरा कुमार | २००९ ते २०१४ |
| १६. | सोळावी | श्रीमती सुमित्रा महाजन | २०१४ ते २०१९ |

## स्वाध्याय

**प्र. १) टिपा लिहा.**

» लोकसभेची रचना
» लोकसभेच्या सदस्यत्वासाठीची पात्रता
» लोकसभेचा सभापती
» राज्यसभेची रचना
» राज्यसभेच्या सदस्यत्वासाठीची पात्रता
» राज्यसभेचा अध्यक्ष
» विधानपरिषदेची रचना
» विधानसभेची रचना

**प्र. २) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

» भारतीय केंद्रीय कायदेमंडळाचे अधिकार व कार्ये स्पष्ट करा.
» घटकराज्यांच्या विधिमंडळाचे अधिकार व कार्याविषयी माहिती लिहा.